लोकमत १३/०८/२०१६

# कायद्याच्या आधारे शोषणाविरोधी लढा द्या

## अलोक अग्रवाल : सेक्स वर्कर्स महिलांचा न्याय व्यवस्थेशी संवाद चर्चासत्र

सांगली : समाजात वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. तुमच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी कायद्यात तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे भीती न बाळगता कायद्याचा आधार घेत लढा द्या, न्यायव्यवस्था तुमच्या पाठीशी राहील, असा विश्वास राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव अलोक अग्रवाल यांनी शुक्रवारी व्यक्त केला. संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम) आणि 'व्हॅम्प' संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित न्याय व्यवस्थेशी सेक्स वर्कर्सच्या संवाद चर्चासत्रात ते बोलत होते.



संग्राम आणि 'व्हॅम्प' संघटनेच्यावतीने सांगलीत आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन सुनील कोतवाल यांनी केले. यावेळी डावीकडून अलोक अग्रवाल, गीतांजली गोयल, एन. एस. शिंदे, सच्चिदानंद कुलकर्णी, बी. एस. खराडे उपस्थित होते.

अग्रवाल म्हणाले की, व्यवसाय कोणताही असो, तुम्ही समाजाचे घटक आहात हे संविधानाने गृहित धरून अधिकार दिले आहेत. न्याय व्यवस्थेतर्फे मोफत सल्ला व मार्गदर्शन देण्यात येते. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी कार्यरत महिलांमधूनच स्वयंसेवकांची नेमणूक करुन समस्यांचे निराकरण करता येऊ शकते. राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरणच्या गीतांजली गोयल म्हणाल्या की, या व्यवसायातील महिलांना हिंसेला सामोरे जावे लागते. मात्र, त्याविरोधात आवाज उठविला जात नाही. या महिलांनाही सन्मान आहे, हे कोर्टानेही मान्य केल्याने सर्व घटकांनी त्यांच्याशी समानतेनेच वागले पाहिजे. हिंसा झाल्यास ती सहन न करता त्याविरोधात आवाज उठवा.

### महिलांनी मांडल्या समस्या

कार्यक्रमावेळी महिलांना येत असलेल्या समस्या मांडण्याची सूचना करण्यात आली. यावेळी शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी, जातीचा दाखला, शिधापत्रिका, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पोलिसांकडून होणारा त्रास, मुलांच्या नोकरीसाठी होणारी धडपड आदी समस्या यावेळी महिलांनी मांडल्या.

यावेळी राज्य कायदेशीर सेवा प्राधिकरणचे सुनील कोतवाल, बी. एस. खराडे, 'व्हॅम्प'च्या अध्यक्षा दुर्गा पुजारी, एन. एस. शिंदे, सच्चिदानंद कुलकर्णी आदी उपस्थित होते. 'संग्राम'च्या कार्यवाह मीना शेषू यांनी स्वागत केले, तर 'कसम'च्या संचालिका आरती पै यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)





संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम) आणि व्हॅम्प संघटनेच्या संयुक्त विद्यमाने सांगलीत शुक्रवारी 'महिला आणि न्यायव्यवस्था' विषयावर संवाद कार्यक्रम झाला. यावेळी 'नालसा'चे सदस्य सचिव अलोक अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर पहिल्या रांगेत डावीकडून व्हॅम्पच्या अध्यक्षा दुर्गा पुजारी, अ‍ॅड. बी. एस. खराडे, 'सालसा'चे सदस्य सचिव सुनील कोतवाल, 'नालसा'च्या संचालिका गीतांजली गोयल, दुसऱ्या रांगेत डावीकडून शशिकांत माने, 'कसम-संग्राम'च्या संचालिका आरती पै, 'संग्राम'च्या कार्यवाह मीना शेषू आदी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात कार्यक्रमास महिलांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

## अलोक अग्रवाल : वेश्यांच्या कायदेशीर प्रश्नांवर चर्चा

# 'पॅरा लिगल व्हॉलंटीअर्स'मध्ये आता वेश्यांना मुख्य स्थान

सांगली : वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला व त्यासंबंधित कायदेशीर बाबी ठरविताना आणि धोरण कायम करताना पॅरा लिगल व्हॉलंटीअर्स यांची भूमिका महत्त्वाची असते. नॅशनल लिगल सर्व्हिसेस ऑथॉरिटी (नालसा)च्यावतीने स्वयंसेवकांची नियुक्ती करताना आता ते वेश्या महिला, दलित, मुस्लिम महिला, तसेच तृतीयपंथीयातून नियुक्त करण्यात येतील असे सांगून, संग्राम आणि व्हॅम्प संस्थेने अशा महिलांची नावे सुचवावीत, असे आवाहन 'नालसा'चे सदस्य सचिव अलोक अग्रवाल यांनी केले.

येथे संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम) आणि व्हॅम्प संघटनेच्या संयुक्त विद्यमाने 'महिला आणि न्यायव्यवस्था' संवाद कार्यक्रम झाला. याचे उद्घाटन अलोक अग्रवाल यांच्याहस्ते झाले. त्यानंतरच्या सत्रात ते बोलत होते. 'नालसा'च्या संचालिका गीतांजली गोयल, राज्य लिगल सर्व्हिसेस ऑथॉरिटी (सालसा)चे सदस्य सचिव सुनील कोतवाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष एस. पी. तावडे, सदस्य सचिव एन. एच. मखरे, कोर्ट मॅनेजर सच्चिदानंद कुलकर्णी, जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष हरीष प्रताप, सातारा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव खराडे आदी यावेळी उपस्थित होते.

अग्रवाल म्हणाले की, समाजातील वंचित लोकांना सहज आणि योग्य वेळेत न्याय मिळावा, त्यांच्या कायदेशीर अडचणींबाबत त्यांना मार्गदर्शन व्हावे आणि न्यायव्यवस्था व वंचित माणूस यांच्यात सुसंवाद तयार व्हावा, यासाठी 'लिगल क्लिनिक' चालविण्यात येत असून सांगली आणि सातारा येथेही ते वेश्यांसाठी चालविण्यात येईल.

### सदस्यांची गोकुळनगरला भेट

अलोक अग्रवाल व गीतांजली गोयल यांनी सांगलीतील गोकुळनगरमध्ये जाऊन वेश्या महिलांची भेट घेतली व त्यांचे प्रश्न जाणून घेतले. तायवा कोपद आणि तंटामुक्ती समिती गोकुळनगरच्या सर्व महिला यावेळी उपस्थित होत्या.

दुसऱ्या सत्रात गीतांजली गोयल म्हणाल्या की, बलात्काराची तक्रार ही बलात्कार म्हणूनच नोंदवायला हवी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असून त्याची सक्त अंमलबजावणी होण्याची गरज आहे. न्याय मिळविणे हा प्रत्येकाचा अधिकार असून लिगल सर्व्हिसेस ऑथॉरिटी ही समान न्याय या तत्त्वानेच कार्य करीत असते.

एस. पी. तावडे म्हणाले की, वेश्यांसह सर्वच तळागाळातील लोकांना कायद्याची माहिती व्हावी, न्यायप्रक्रियेबाबत त्यांच्या मनातील भीती दूर व्हावी आणि त्यांना न्याय मिळावा यासाठी वकिलांनी पुढाकार घ्यावा.

वेश्या आणि त्यांच्यासंबंधित कार्य करणाऱ्या सेक्स वर्करसना कायद्याची माहिती होण्यासाठी सुसंवादाची गरज असून, कायदेशीर आणि सामाजिक हक्क व अधिकार त्यांना मिळायलाच हवेत, असे 'संग्राम'च्या कार्यवाह मीना शेषू यांनी सांगितले.

मेळाव्यात व्हॅम्प संघटनेच्या अध्यक्षा दुर्गा पुजारी, उपाध्यक्षा नीलव्वा सिध्दरेड्डी यांनी, वेश्या महिलांना शिधापत्रिका, मतदान ओळखपत्र, आधार कार्ड, रहिवासी दाखला आणि जातीचा दाखला मिळविण्यात अडचणी येत असल्याची तक्रार मांडली. रेशम कवठे, किरण देशमुख, छाया जाधव, मीनाक्षी कांबळे, रेणुका कांबळे यांनीही यावेळी समस्या मांडल्या. त्यांना अग्रवाल व गोयल यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

मेळाव्यास सांगलीसह सातारा, बेळगाव आणि बागलकोट जिल्ह्यातील तीनशे महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. 'कसम-संग्राम'च्या संचालिका आरती पै यांनी स्वागत केले. (प्रतिनिधी)

पुढारी
सांगली, रविवार
१४ ऑगस्ट २०१६

# पॅरा लिगल व्हॉलंटिअर्समध्ये वेश्यांना स्थान : अग्रवाल

**सांगली : प्रतिनिधी**

वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला व त्या संबंधित कायदेशीर बाबी आणि धोरण ठरविताना पॅरा लिगल व्हॉलंटिअर्सना स्थान देण्यात येणार आहे. नालसाच्यावतीने ही नियुक्ती करताना पन्नास टक्के व्हॉलंटिअर्स हे वेश्या महिला, दलित, मुस्लिम महिला व तृतीय पंथींची प्राधान्य देण्यात येणार आहे. संग्राम आणि व्हॅम्प संस्थेने अशा महिलांची नावे सुचवावीत, असे आवाहन नॅशनल लिगल सर्व्हिसेस ऑथॉरिटीचे सदस्य सचिव अशोक अग्रवाल यांनी केले.

संपदा ग्रामीण महिला संस्था आणि व्हॅम्प संघटनेतर्फे महिला व न्याय व्यवस्था संवाद कार्यक्रम सांगलीत नुकताच झाला. त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. पी. तावडे म्हणाले, तळागाळातील लोकांना कायद्याची माहिती होण्यासाठी वकिलांनी पुढाकार घ्यावा. स्वागत कसम-संग्रामच्या संचालक आरती पै यांनी केले. प्रास्ताविकात संग्रामच्या मीना शेषू यांनी सेक्स वर्कर्सना कायदेशीर व सामाजिक हक्क आणि अधिकार मिळायला हवेत, असे सांगितले.

यावेळी सुनील कोतवाल, गीताजंली गोयल, एन. एच. मखरे, सच्चिदानंद कुलकर्णी, ॲड. हरिश प्रताप, खराडे, दुर्गा पुजारी, नीलव्वा सिध्दरेड्डी, रेशम कवठे, किरण देशमुख, छाया जाधव, मीनाक्षी कांबळे, रेणुका कांबळे यांच्यासह सांगली, सातारा, बेळगाव, बागलकोट येथील महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.




सांगली : महिलांसाठी कायदा संवाद कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना सदस्य सचिव आलोक अग्रवाल, गीतांजली गोयल, सुनील कोतवाल, एस.पी. तावडे आदी उपस्थित होते.

# सांगलीत वारांगणांसाठी कायदा मदत केंद्र

## अग्रवाल : महिला, न्याय व्यवस्था संवाद कार्यक्रम

सांगली, ता. १३ : सांगली आणि साताऱ्यात वारांगणांसाठी कायदा मदत केंद्र सुरू करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय कायदा सहाय्य प्राधिकरणाचे सदस्य-सचिव अलोक अग्रवाल यांनी सांगितले. येथील संपदा महिला संस्था आणि व्हॅम्प संघटनेच्या वतीने आयोजित महिला आणि न्याय व्यवस्था संवाद कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. या वेळी प्राधिकरणाच्या संचालिका गीतांजली गोयल, राज्य सदस्य सुनील कोतवाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव खराडे आदी उपस्थित होते.

श्री. अग्रवाल म्हणाले, ''वारांगणांसाठी कायदेशीर बाबी ठरवताना कायदा सहाय्य स्वयंसेवकांची भूमिका महत्त्वाची असते. अधिकरणाच्या वतीने हे स्वयंसेवक नेमताना समाजातील वेश्या महिला, तृतियपंथी तसेच समाजातील वंचित घटकांतील व्यक्तींना प्राधान्य दिले जाईल. या क्षेत्रात काम करणाऱ्या संग्रामसारख्या संस्थांनी नावे सुचवावीत. वंचित लोकांना सहज आणि योग्य वेळेत न्याय मिळावा त्यांना कायदेशीर मार्गदर्शन व्हावे यासाठी सुसंवाद तयार व्हावा यासाठी लीगल क्लिनिक चालवण्यात येतील.''

संग्रामच्या कार्यवाह मीना शेषू यांनी प्रास्ताविक केले. मेळाव्यात व्हॅम्पच्या अध्यक्षा दुर्गा पुजारी, उपाध्यक्ष नीलव्वा सिद्धरेड्डी यांनी वेश्यांना रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, आधार कार्ड, रहिवासी दाखला, जातीचा दाखला मिळावेत अशी मागणी केली. रेशम कवठे, किरण देशमुख, छाया जाधव, मीनाश्री कांबळे, रेणुका कांबळे यांनी समस्या मांडल्या. सातशेंवर महिला या वेळी उपस्थित दर्शविली.

### तक्रार बलात्कार म्हणूनच नोंदवा

श्रीमती गोयल म्हणाल्या, ''बलात्काराच्या तक्रारी बलात्कार म्हणूनच नोंदवल्या गेल्या पाहिजेत, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्याची सक्त अंमलबजावणी झाली पाहिजे. न्याय मिळवणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. महिलांसाठी प्राधिकरण त्यासाठी काम करते.''

# Legal services team visits Sangli & Satara, brings hope to sex workers

✍ Yogesh Pawar p_yogesh@dnaindia.net



Enlarge Image

Sex workers in the western Maharashtra town of Sangli have expressed their happiness over the visit by member secretary of National Legal Services Authority (NALSA) Alok Aggarwal and director Geetanjili Goel on Friday and Saturday. They hope that the visit will send out a strong message.

The visit assumes importance since they took time to meet members of Veshya Anyaya Mukti Parishad (VAMP), a sex worker collective. "After the regular de-humanising experience of abuse and badmouthing from police and lower courts, this was completely new. Who would have thought that such senior officials would actually come and talk to us," said sex worker and community activist Nilawwa Sidhareddy from Karad.

The team, which had members from other organisations as well as district and sessions judge S Tawade, met with men, women and transgender sex workers, especially Dalit and Muslims, who faced discrimination time and again. They heard from the community members about their work, collectivisation efforts and their challenges.

VAMP members talked about the challenges they faced while trying to access social schemes. Many of the community members do not have proper residence documentation as they have move frequently for work.

Activist Sidhareddy lamented the plight of sex workers' children, who were also unable to obtain certificates to access schemes and benefits reserved for SC/ST categories. "Often, women can't provide evidence of children's father's lineage for 50 years. So, the children continue to be denied caste certificates despite being from the SC/ST category," she told the visitors.

Other sex workers like Chayya from Satara spoke about indiscriminate raids against women in sex work. “We are sent to rehabilitation homes and not allowed to meet our families and lawyers for at least 21 days. We keep telling the judge that we are adults and not trafficked, but they don’t listen.”

Meanwhile, assuring the community, Aggarwal said, “Legal services will involve women, men and trans sex workers as para legal volunteers so that they can be a vital link between the community and legal services. The District Legal Services Authorities will conduct legal aid clinics to understand and resolve your issues.”

Responding to complaints of lack of access to lawyers following rescue drives, he said a committee comprising the Legal Services Authority, DSP and community members could be formed to ensure that sex workers sent to rehabilitation homes had access to free legal aid.

Over 700 sex workers from Sangli and Satara of Maharashra and Belgaum and Bagalkot of Karnataka were present at the meeting organised by NGO Sangram, which spearheads the battle for legal rights and dignity for sex workers. Also present at the meeting were Sunil Kotwal, member secretary, Maharashtra State Legal Services Authority; NH Makhare, member secretary, Sangli District Legal Services Authority and J Kharade, member secretary of Satara District Legal Services Authority.

The initiative to institute legal aid clinics for sex workers, train sex workers as para-legal volunteers and constitute a committee with DLSA, police and sex worker community as members could also serve as a model engagement with the vulnerable communities to enable them engage more effectively with the legal system in India.

**Caption: The legal services team members interact with sex workers in Sangli on Tuesday**

**Published Date:** Aug 17, 2016

http://www.dnaindia.com/mumbai/report-nalsa-team-s-visit-brings-hope-to-sangli-satara-sex-workers-2245850